# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### नागपूर येथील पर्यटन स्थळांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) १३०८१ (२९-०४-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील अविकसित पर्यटन स्थळांच्या विकासासाठी निधी उपलब्ध होत नसल्याने येथील पर्यटकांच्या संख्येत घट झाल्याचे माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रामटेक तालुक्यातील कापूर बाहुली, नगरधन किल्ला, हेडप्पा टेकडी, जपाला, नारायण टेकडी, पारशिवनी तालुक्यातील कोलितमारा, कुवांरा भिवसेन, धोगरा महादेव, कालभैरव, पैठ, कान्हादेवी, पेंच जलाशय तर कळमेश्वर तालुक्यातील खुमारी या पर्यटनस्थळांचा विकास होण्याबाबत व अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाने निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (११-१०-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) रामटेक तालुक्यातील पर्यटन स्थळांचा विकास करुन सोयीसुविधा पुरविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभाग, आदिवासी विभाग तसेच जिल्हा नियोजन समिती, नागपूर मार्फत निधी मंजूर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सांगली जिल्ह्यातील शाळांनी संच मान्यता पदाचा तपशील भरुन देण्याबाबत

**(२) १३२७४ (०६-०४-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व संच मान्यता शाळांना सन २०२१-२०२२ मध्ये कार्यरत पदाचा तपशिल भरुन देण्याची सूचना शासनाने केली असता सांगली जिल्ह्यातील ५५१ शाळांनी संच मान्यता करिता सन २०२१-२०२२ मध्ये कार्यरत पदांचा तपशिल भरला नसून यात महानगरपालिका क्षेत्रातील ९० शाळांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संच मान्यता पदांचा तपशिल भरुन देण्याकरीता शाळांना कळविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक १० जून २०२२ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ ची संचमान्यता कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०१९-२० साठी मंजूर असलेली पदे २०२१-२२ च्या संचमान्यतेमध्ये ग्राहय धरण्यात आलेली आहेत. त्यामुळे सद्य:स्थिती सन २०२१-२२ च्या संचमान्यता या सन २०२०-२१ च्या संचमान्यते प्रमाणेच कायम ठेवाव्यात असे कळविले आहे

---

## राज्यातील पर्यटन वैभवाची जगाला ओळख करुन देण्याबाबत

**(३) १५४९४ (२८-१२-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक विविध कंपन्यांकडून आयोजित केल्या जाणाऱ्या बैठका, प्रोत्साहन कार्यशाळा, चर्चासत्र, किल्ल्यांचे संवर्धन आणि कार्यक्रमांद्वारे राज्यातील पर्यटन उद्योगांना मोठी चालना मिळू शकते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन राज्यातील पर्यटन वैभवाची जगाला ओळख व्हावी, यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (११-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील पर्यटन वैभवाची जगाला ओळख करुन देण्यासाठी पर्यटन विभागामार्फत दरवर्षी वार्षिक पणन व ब्रँडिग कृती आराखडा तयार करुन देश-विदेशात प्रसिध्दी मोहिम राबवली जाते. त्याअंतर्गत विभागामार्फत IMEX जर्मनी, JATA जपान, WTM London, Fitur Spain, ITB Berlin इ. नामांकित पर्यटन प्रदर्शनामध्ये सहभाग घेऊन बैठका, चर्चा सत्र, कार्यशाळा, रोडशोज्, इ. माध्यमातून राज्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळण्यासाठी प्रयत्न केले जातात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील पोलीस निवास बांधकामाबाबत

**(४) २१८४७ (०४-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या मुक्ताईनगर, सावदा, बोदवड येथील पोलीस वसाहतीतील पोलीस निवासस्थाने कालबाह्य व दुरवस्थेत असून पोलिसांसाठी वसाहतीत नवीन निवासस्थाने बांधण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिसांसाठी वसाहतीत नवीन निवासस्थाने बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) :** (१) होय.

(२) मुक्ताईनगर येथील ४४ निवासस्थाने बांधकाम व सावदा येथे ६९ निवासस्थाने बांधकाम करण्याची कामे शासनाने मंजूर केलेल्या दिनांक ०७/०२/२०२३ च्या आदेशानुसार पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या प्राधान्यक्रम यादीत घेण्यात आली असून निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच बोदवड येथे पोलीस स्टेशन व ४८ निवासस्थाने बांधकाम करण्याची कामे शासनाने मंजूर केलेल्या दिनांक ०८/०१/२०२४ च्या आदेशानुसार पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या प्राधान्यक्रम यादीत घेण्यात आली असून प्रकल्पांस संकल्प नकाशे बनविणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत सादर करण्यात आलेले प्रकल्पाचे संकल्प नकाशे, नकाशा मान्यता समितीने मान्य केले असून, निविदा नकाशे, अंदाजपत्रके बनविणेचे काम प्रगतीपथावर असून निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पोलिसांच्या घरांचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ अतिरिक्त अधिकार देण्याबाबत

**(५) २२०७४ (०५-०१-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांच्या घरांचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आलेली असून सदर बोर्डाकडे १८७ शहरातील पोलिसांच्या घरांची वसाहतीच्या बांधकामाचे प्रस्ताव प्राप्त आहेत, पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणात स्टाफ कॉर्टर्स बांधणे आवश्यक असून अर्थसंकल्पातून प्राप्त होणारे अनुदान अपुरे असल्यामुळे गृह विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत डीसीपीआर २०३४ मधील विनियम ३३ (३) (अ)च्या अनुषंगाने अशा प्रकल्पांसाठी विकासक म्हणून घोषित करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी, २०१९ रोजी निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत डीसीपीआर - २०३४ मधील विनियम ३३(३)(अ) च्या अनुषंगाने अशा प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांना शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-०१२१/प्र.क्र.२६/पोल-७, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२१ अन्वये विकासक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इंडसइंड बँकेच्या कर्ज वसूली अधिकाऱ्यांनी केलेल्या छळाला कंटाळून कर्जदाराने आत्महत्या केल्याबाबत

**(६) २२६५४ (११-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंडसइंड बँकेच्या कर्ज वसूली अधिकाऱ्यांनी सातत्याने मानसिक त्रास देवून आर्थिक विवंचनेत अडकलेल्या कर्जदार लक्ष्मण थोटा यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्या प्रकरणी चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाणे यांच्याकडे दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशीच्या अनुषंगाने आणि कर्ज वसूलीसाठी अनन्वित त्रास देवून कर्जदारास आत्महत्या करण्यास प्रवृत्त करायला लावणाऱ्या संबंधित बँकेच्या दोषी अधिकारी/कर्मचारी किंवा वसूली दलालांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी श्रीमती अनिता लक्ष्मण थोटा यांच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये श्रीमती अनिता लक्ष्मण थोटा व त्यांचे पती लक्ष्मण थोटा यांनी मिळून इंडसइंड बँकेकडून दिनांक ३०/११/२०१७ रोजी रुपये ९१,५०,०००/- रकमेचे कर्ज घेतले होते. सदर कर्जाचे हप्ते ते नियमीत बँकेत भरणा करत होते. श्री.लक्ष्मण थोटा यांचा दिनांक २५/०७/२०१९ रोजी रेल्वे अपघातामध्ये मृत्यू झाला. त्यानंतर दिनांक ०७/०३/२०२० रोजी त्यांनी कर्जाचे हप्ते नियमित न भरल्याने त्याचे खाते एन पी ए करण्यात आले व त्यानंतर त्यांनी गहाण ठेवलेली मालमत्ता इंडिया बुल्स अरिस्ट रिकन्ट्रक्शन प्रा. लि. यांनी सप्टेंबर, २०२३ मध्ये सिल केली आहे.

श्रीमती अनिता लक्ष्मण थोटा यांनी सदर बाबत कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई यांच्याकडे अर्ज क्र. ४१३/२०२३ प्रमाणे दावा केला दाखल असून प्रलंबित आहे. श्रीमती अनिता लक्ष्मण थोटा यांचे पती लक्ष्मण थोटा यांनी इंडसइंड बँकेच्या कर्ज वसुली अधिकाऱ्यांनी केलेल्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचे निष्पण होत नसल्याने तसेच फौजदारी पात्र गुन्हा होत नसल्याने कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रात्रशाळेबाबत सर्वकष धोरण निश्चित करण्याबाबत शासनाने नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(७) २२९०६ (२२-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.अरुण लाड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही शिक्षण तज्ज्ञांनी रात्रशाळेबाबत सर्वकष धोरण निश्चित करावे अशी मागणी शासनाकडे सन २०२१ मध्ये मा.शालेय शिक्षण मंत्री यांना लेखी निवदेनाद्वारे केली असल्याचे माहे एप्रिल,

२०२४ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर मागणीनुसार, शासनाने रात्रशाळांचे सर्वकष धोरण ठरविण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करुन दिनांक ८ डिसेंबर,२०२२ रोजीच्या शासननिर्णयान्वये समिती गठीत करुन सदर समितीने १ महिन्यात आपला अहवाल शासनास सादर करावा, असे त्यामध्ये नमूद करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समितीच्या स्थापनेनंतर म्हणजे समितीने दिनांक १९ डिसेंबर,२०२२ नंतर अद्याप कोणतीही बैठक घेतली नसल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील रात्रशाळांना विशेष दर्जा देण्याची मागणी तसेच कमाल १० विद्यार्थ्यांना १ शिक्षक, येथील बालकांकरीता रात्र बहुजन योजना, ३ तासांची रात्र शाळा पूर्णवेळ शाळा समजणे, शिक्षकांना आठवडी कार्यभार १२ घड्याळी तासांहून अधिक नसावा इ. मागणी संघटनांमार्फत छात्रभारती या शिक्षक- विद्यार्थी संघटनेमार्फत केली जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर समितीने १ महिन्यांत शासनास आपला अहवाल सादर करणे अपेक्षित असताना केवळ एकच बैठक घेण्याची कारणे काय तसेच शासनाने रात्रशाळांचे सर्वकष धोरण ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच मूकबधीर, अंध व मानसिक दुर्बलांच्या शाळांच्या धर्तीवर, रात्रशाळेला विशेष शाळेचा दर्जा देण्याबाबत शासनाकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) रात्रशाळेचे सुधारित धोरण तयार करणेबाबत आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अंतरिम अहवाल प्राप्त झाला असून, अंतिम अहवाल प्राप्त होताच रात्रशाळेबाबतचे सर्वकष सुधारित धोरण विहीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

यामध्ये रात्रशाळेशी संबंधित सर्व मागण्या व प्रश्न यांचा साकल्याने विचार रात्रशाळेचे सर्वकष धोरण तयार करताना करण्यात येणार आहेत.

---

## अप्रशिक्षित शिक्षण सेवकांचा सेवा कालावधी वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबत

**(८) २३०६४ (२२-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये प्रशिक्षित उमेदवार न मिळाल्यास अप्रशिक्षित उमेदवारांची नियुक्ती केली जात असून, सदर उमेदवारांना सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करावे लागत असून अनुसूचित जाती/ जमातीतील उमेदवारांची बहुतांशपणे अप्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून नियुक्त्या झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये जे उमेदवार अप्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून नियुक्त झालेल्याना सेवेची बारा वर्षे पूर्ण झाल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणी लागू होते. त्यांचा अप्रशिक्षित शिक्षण सेवक

कालावधी वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ग्राह्य धरला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अप्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर तशी पद मान्यताही या उमेदवारांना प्राप्त होत असल्याने शासनाने अशा अप्रशिक्षित शिक्षण सेवकांचा अप्रशिक्षित सेवा कालखंड वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असल्याने त्या विभागाच्या अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मराठी व सेमी इंग्रजी शाळांमध्ये इंग्रजी अध्यापनासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारांची निवड करण्याबाबत

**(९) २३१६५ (२२-०७-२०२४) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठी व सेमी इंग्रजी शाळांमध्ये इंग्रजी अध्यापनासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारांची निवड करण्यात येईल या शासनाने घेतलेल्या निर्णयास समन्वयक, मराठी शाळा संस्थाचालक संघटना यांनी विरोध केला असून त्यासंबंधी निवेदनाद्वारे तक्रार मा.शालेय शिक्षण मंत्री आणि मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निवेदनाद्वारे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०१९ अन्वये मराठी व इंग्रजी शाळांमध्ये इंग्रजी अध्यापनासाठी इयत्ता ६ वी व ८ वी करीता संबंधित विषयातून पदवी उत्तीर्ण व सामान्य पदवी परीक्षा संबंधित विषयातून ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १९/०६/२०१३ मधील सेमी इंग्रजी माध्यमाच्या सुरु केलेल्या तुकडीवर व्यावसायिक शिक्षण (डीएड/बीएड) इंग्रजी माध्यमातून झालेल्या उमेदवाराची नियुक्ती करणेबाबतची तरतूद करण्यात आली आहे. या शासनाच्या निर्णयास संस्थाचालक व काही संघटना यांचा विरोध होत असतो. इंग्रजी हा भाषा विषय असल्याने त्यास इतर भाषिक शिक्षकांपेक्षा इंग्रजी भाषेतून शिक्षण घेतलेल्या शिक्षकांची जास्त आवश्यकता आहे. जेणेकरुन इंग्रजी भाषा म्हणून हा विषय विद्यार्थ्यांना आत्मसात करणे सोईचे ठरेल. यास्तव सदरची तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पूणे मधील तज्ञांमार्फत परिपूर्ण अभ्यास करुन विहीत करण्यात येत असते. यासर्व बाबी विचारात घेता, सदरच्या अर्हतेमध्ये बदल करणे संयुक्तिक ठरणार नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांकरिता गाव तिथे गोदाम योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१०) २३३४६ (२२-०७-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना शेती प्रक्रिया आणि कृषी विषयक साधनसामुग्री साठविण्याच्या अनुषंगाने साठवण क्षमता उपलब्ध करून देण्याकरीता पणन विभागामार्फत गाव तिथे गोदाम ही योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेच्या अनुषंगाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या अभ्यास शासनास अहवाल सादर केला आहे तसेच दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीला सदर योजनेचे प्रारूप तयार करण्यास दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीच्या अहवालात कोणत्या ठळक बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत, त्याचा तपशील काय आहे तसेच सदर योजनेचे प्रारुप समितीने दोन महिन्यात केले आहे काय, व त्यानुषंगाने सदरहू योजना प्रत्यक्षात केव्हापासून कार्यान्वित करण्यात येणार आहे, याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२१-०७-२०२५) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

गाव तिथे गोदाम या योजनेसाठी अभ्यास गटाची दिनांक १३/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापना केली होती. सदर समितीने माहे सप्टेंबर, २०२३ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १५/०१/२०२४ नुसार प्रारुप समिती गठीत करुन सदर समितीने शासनास शिफारशी सादर केल्या आहेत. सदर शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) या प्रकरणी पहिल्या टप्प्यात ६०० मे.टन क्षमतेचे प्रायोगिक तत्वावर १०० गोदामे बांधण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पवित्र पोर्टल मध्ये कला शिक्षकांचा समावेश करण्याबाबत

**(११) २३४४३ (२२-०७-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक कला शिक्षकांचा अद्यापही पवित्र पोर्टलमध्ये समावेश झालेला नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कला शिक्षकांचा पवित्र पोर्टलमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) व (२) संच मान्यतेच्या विहीत करण्यात आलेल्या निकषांमध्ये शिक्षक निश्चित करताना कला या विषयाकरीता पूर्णवेळ शिक्षक देण्याची तरतूद नसल्याने, या विषयासाठी शिक्षक नव्याने नियुक्त केले जात नव्हते. आता दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या संचमान्यतेच्या निकषांमध्ये विशेष शिक्षक कला व क्रीडा या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. यास्तव संचमान्यतेच्या निकषानुसार या विषयाकरीता पदे निश्चित होऊन यापुढील शिक्षक भरतीमध्ये कला व क्रीडा या विषयाकरीता शिक्षकीय पदांचा समावेश होणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या आयटी शिक्षकांच्या समायोजनाबाबत

**(१२) २३४४७ (२२-०७-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयाकडे सन २००१ पासून कार्यरत असणाऱ्या आयटी शिक्षकांच्या समायोजनाबाबत अद्यापही निर्णय झालेला नसल्याचे माहे, एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मान्यता असणाऱ्या १२९ आयटी शिक्षकांच्या समायोजनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२६-०९-२०२५) :** (१) व (२) माहिती तंत्रज्ञान विषयाच्या वैयक्तिक मान्यताप्राप्त शिक्षकांचे त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार कनिष्ठ महाविद्यालयाच्या मंजूर पायाभूत पदांवर समायोजनाचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. तथापि, वित्त विभागाने सदरहू प्रस्ताव अमान्य केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामातून कार्यमुक्त करणेबाबत

**(१३) २३४५६ (१२-०८-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक २११९७ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकांना प्रत्यक्ष शिक्षणाव्यतिरिक्त (जनगणना व निवडणूक वगळता) कोणतीही अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नये अशी RTE - २००९ मध्ये तरतूद असून शिक्षकांना अध्यापनाशिवाय

देण्यात येणारी इतर अशैक्षणिक कामे यापुढे देण्यात येऊ नयेत, याबाबत मा.न्यायालयाने शासनास आदेशित केले असूनही, नवभारत कार्यक्रमाअंतर्गत साक्षर/निरक्षर सर्वेक्षणाचे काम आणि सतत चालणाऱ्या मतदार नोंदणी व इतर सर्वेक्षण प्रक्रियेत शिक्षकांना गुंतवून निवडणुकीची बीएलओची कामे देण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांची हजारो पदे रिक्त असल्याने मराठी शाळांचा दर्जा खालावत चालला आहे. शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी शिक्षकांना अधिक वेळ द्यावा लागणार असून, नियतकालिक मुल्यांकन चाचणी, शाळांच्या नियमित परीक्षा आणि निकाल, दहावी व बारावीच्या उत्तरपत्रिकांची तपासणी अशी कामे सुरु असतानाच शिक्षकांना शैक्षणिक काम सोडून अशैक्षणिक कामे दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, सदर कालावधीत शिक्षकांना निवडणुकीची कामे देण्यात आल्यामुळे शिक्षक भारती संघटनेसह इतर अनेक संघटनांनी शासनाकडे विरोध नोंदवून अशैक्षणिक कामांची जबाबदारी कमी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, खासगी अनुदानित शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांची जबाबदारी कमी करण्यासाठी धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे अध्यक्षतेखाली शैक्षणिक व अशैक्षणिक कामांच्या अनुषंगाने सर्वकष अभ्यास करुन उचित निर्णय घेण्याच्या दृष्टीने समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीचा शिफारशीसह अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक भारती संघटनेने शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांची जबाबदारी कमी करण्याबाबत केलेल्या मागणीच्या तसेच समितीच्या शिफारशीसह प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नयेत तसेच कोणती कामे शैक्षणिक आहेत व अशैक्षणिक आहेत, याबाबतची स्पष्टता यावी याकरीता दिनांक ०६/०९/२०२३ रोजी प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. समितीकडून प्राप्त अहवाल विचारात घेऊन दिनांक २३/०८/२०२४ रोजी शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विनाअनुदानित ते अनुदानित पदावरील शिक्षकांच्या बदलीला स्थगिती देणारा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(१४) २३४५८ (२२-०७-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २१३३७ ला दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ डिसेंबर, २०२२ च्या शासन परिपत्रकांन्वये विनाअनुदानित ते अनुदानित पदावरील बदलीला पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनाअनुदानित पदावर गेल्या १० ते १२ वर्षांपासून काम करणाऱ्या शिक्षकांवर हा अन्याय झाला असल्यामुळे दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, यासाठी राज्यभरातील शिक्षक संघटनांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदली प्रक्रियेस स्थगिती दिल्याने आयुक्त (शिक्षण) यांनी याबाबतच्या शिफारशीसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजीचा शासन निर्णय रद्द करून विनाअनुदानित पदावर काम करणाऱ्या शिक्षकांवरील अन्याय दूर करून त्यांना न्याय देण्याबाबत तसेच आयुक्त (शिक्षण) यांच्या अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत मा.न्यायालयाच्या आदेशानुसार शासन परिपत्रक दिनांक २९/०४/२०२४ अन्वये शासन परिपत्रक, दिनांक ०१/१२/२०२२ रद्द करण्यात आले आहे. तथापि, अशा बदल्यांबाबतचे अधिकार शासनाकडे घेण्याबाबतच्या दिनांक २९/०४/२०२४ च्या शासन परिपत्रकानुसार नियमात सुधारणा न केल्याने कार्यवाही न करण्याबाबत मा.न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ४१-अ नियमात अंतिमत: बदल होत नाही तोपर्यंत नियम ४१-अ मधील तरतूदीनुसार प्रस्ताव तपासून सक्षम प्राधिकारी निर्णय घेऊ शकतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात क्रिडा क्षेत्राच्या विकासासाठी पायाभूत सुविधां उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) २३५३३ (२०-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील खेळाडूंनी फुटबॉल, क्रिकेट, कुस्ती, कबड्डी बॉक्सिंग, हॉकी इत्यादी खेळांमध्ये देशाचे व राज्याचे प्रतिनिधित्व केलेले असून, सध्या अकोला जिल्ह्यात फुटबॉल खेळासाठी मैदान उपलब्ध नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय स्तरावर खेलो इंडिया, राष्ट्रीय क्रीडा शोध प्रतिभा योजना, पंचायत युवा क्रीडा खेल अभियान अशा योजना राबविल्या जात असतानाही अकोला जिल्ह्यामध्ये क्रीडा क्षेत्राकरीता पायाभूत सुविधा निर्माण होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकोला जिल्ह्यात फुटबॉल खेळाकरीता मैदान उपलब्ध करून देण्याबाबत तसेच जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राच्या विकासाकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. माणिकराव कोकाटे (१०-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) शासन निर्णय दिनांक २३/०३/२०२२ नुसार अकोला जिल्हा क्रीडा संकुलास रुपये १५००.०० लक्ष इतके शासन अनुदान मर्यादा आहे. अकोला जिल्हा क्रीडा संकुल समितीने सादर केलेल्या रुपये ८२५.४१ लक्ष अंदाजपत्रकास मान्यता देऊन रुपये ८००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. जिल्हा क्रीडा संकुल समिती, अकोला अंतर्गत स्व. वरांत देसाई स्टेडियम, लालबहादुर शास्त्री स्टेडियम व रामदास पेठ असे तीन स्टेडियम कार्यरत आहे. स्व. वसंत देसाई स्टेडियम येथे ४०० मी धावनपथ, जलतरण तलाव, बैडमिंटन हॉल, बास्केटबॉल कोर्ट, खो-खो, कबड्डी, हॅण्डबॉल, व्हॉलीबॉल, नेटबॉल चे मैदाने, कुस्ती, वेटलिफ्टींग, तायक्वांदो चे एरिना, अद्यावत बॉक्सींग रिंग व प्रशासकीय इमारत इ. तयार करण्यात आलेले आहेत. लाल बहादुर शास्त्री स्टेडियम येथे फुटबॉल मैदान, हॉकी मैदान, वॉकींग ट्रॅक, तरोच प्रेक्षक गॅलरी क्रीडा वसतिगृह, सदर क्रीडा सुविधाचा वापर खेळाडू व नागरीक यांचेमार्फत सुरु आहे. रामदास पेठ येथे जिम्नॅस्टिक हॉल, रायफल शुटिंग हॉल तयार करण्यात आला असून ऑलिम्पिक दर्जाच्या जलतरण तलावाचे काम प्रगती पथावार आहे. स्व वसंत देसाई स्टेडियम येथे ४०० मीटर सिंथेटीक ट्रॅक तयार करणेचा प्रस्ताव खेलो इंडिया अतर्गत केंद्रशासनास शिफारस करण्यात आली आहे. लाल बहादुर शास्त्री स्टेडियम येथे फुटबॉल व हॉकी खेळाकरीता ग्रास ग्राऊंड साठी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्ताव अंदाजपत्रक व आराखड्यास राज्य क्रीडा विकास समितीसमोर मान्यतेकरीता सादर करण्यात येईल.
(३) लाल बहादुर शास्त्री स्टेडियम अकोला येथे फुटबॉल व हॉकी खेळाकरीता मैदान तयार करण्यात आले असून त्यावर दरवर्षी शासना मार्फत आयोजित जिल्हास्तर व विभागस्तर फुटबॉल क्रीडा स्पर्धा तसेच संघटनेद्वारा व हौशी फुटबॉल क्लब द्वारे ऑल इंडिया फुटबॉल स्पर्धा आयोजित केल्या जातात. जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत लाल बहादुर शास्त्री स्टेडियम येथे फुटबॉल खेळाचे मैदान दुरुस्ती व बॅरीगेटींग करण्यात आले आहे. त्यामुळे स्वतंत्र असे फुटबॉल मैदान तयार झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील पाडळसरे धरणाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करणेबाबत

**(१६) २३७२२ (२२-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील पाडळसरे प्रकल्पाला २८०० कोटी रुपयांची केंद्रीय जल आयोगाने मंजूरी दिली असून, सदर प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(१३-०२-२०२५) :** (१) होय. हे खरे आहे. केंद्रीय जल आयोगाच्या दिनांक ११/०३/२०२४ च्या पत्रान्वये निम्न तापी पाडळसे प्रकल्पासाठी रुपये २८८८.४८ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता प्राप्त झाली आहे.
(२) व (३) होय. हे खरे आहे. सदर प्रकल्प PMKSY योजनेत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासन पत्र दिनांक ३१/०५/२०२४ अन्वये केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तारळी (ता.पाटण, जि.सातारा) धरणावरील अदानी ग्रीन एनर्जी प्रोजेक्ट या वीज निर्मिती प्रकल्पाला १०२ गावांनी विरोध दर्शविल्याबाबत

**(१७) २४०५१ (१४-०८-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारळी (ता.पाटण, जि.सातारा) धरणावरील अदानी ग्रीन एनर्जी प्रोजेक्ट या वीज निर्मिती प्रकल्पाला तारळे विभागातील १०२ गावांनी विरोध दर्शविला असून या प्रकल्पाविरोधात कृती समिती स्थापन करून सदर प्रकल्प येथून हद्दपार करण्याचे निवेदन मा.जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तारळी धरणातील जलसाठा हा पुर्णपणे सिंचनासाठी राखीव असून पाण्याचे यापूर्वीच वाटप झाल्याने तारळी जलाशयातून एक थेंबही पाणी या प्रकल्पाला देता येणार नसतानाही कोणत्या आधारावर येथे अदानी ग्रीन एनर्जी प्रोजेक्ट वीज निर्मिती करू शकतो असा प्रश्न १०२ गावातील नागरिकांनी उपस्थित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदर परिसर आंतरराष्ट्रीय जैविक संपदेचा वारसा आणि विविध अहवालांच्या संदर्भानूसार येथे कोणताही नियोजित प्रकल्प राबविता येणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांना निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे नाही.
मंजूर प्रकल्प अहवालानुसार तारळी धरणाचा एकूण पाणी वापर ६.५४ टीएमसी असून तो खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | क्षेत्रियवाटप | परिमाणएकक |
|---|---|---|
| १ | सिंचनासाठी | ६.२८ टीएमसी |
| २ | पिण्यासाठी | ०.०९ टीएमसी |
| ३ | बाष्पीभवन व्यय | ०.१७ टीएमसी |
| | एकूण | ६.५४ टीएमसी |

शासन निर्णय दिनांक १७/११/२०१६ अन्वये तसेच दिनांक २८/१२/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ११० व्या बैठकीतील ठराव क्र.११०/४० अन्वये, प्रवर्तक अदानी ग्रीन एनर्जी लि. अहमदाबाद या संस्थेच्या तारळी उदंचन प्रकल्पास ०.०१६ टीएमसी बिगर सिंचन पाणी आरक्षणास मान्यता मिळालेली आहे.

(३) हे खरे नाही.

भारत राजपत्र, पर्यावरण, वन आणी जलवायु परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४/०९/२००६ व दिनांक १८ मे, २०२३ च्या अधिसूचनेनूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेलवली (ता.पनवेल) येथे स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताने बांगलादेशी घुसखोर व्यक्तीने शासकीय कागदपत्रे बनविल्याबाबत

**(१८) २४२४१ (१४-०८-२०२४) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे स्थानिक अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे इनामुल उमर मुल्ला या बांगलादेशी घुसखोराने मनोहर राहू पवार या नावाने बोगस रेशनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आधारकार्ड, स्थानिक वास्तव्याचा दाखला, वयाचा दाखला, डोमिसाइल सर्टिफिकेट, शाळा सोडल्याचा दाखला, स्वत:चे मतदान ओळखपत्र बनवून घेतल्याची व एका मराठी मुलीसोबत लग्न करुन गेल्या १० वर्षांपासून चिखले गावात राहत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही अतिशय गंभीर बाब असून सर्वसामान्य स्थानिक रहिवाशांना साधे रेशनकार्ड काढायचे असेल तर त्यांची कसून चौकशी केली जाते, मात्र इनामुल उमर मुल्ला या बांगलादेशी घुसखोराला ही शासकीय कागदपत्रे कशी मिळाली, असा प्रश्न स्थानिक नागरिक करीत असून त्या-त्या शासकीय विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्याची कसून चौकशी करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या शासकीय विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०२५) :** (१) हो, हे खरे आहे.
(२) सदर गुन्ह्यातील आरोपी इनामुल उमर मुल्ला व इतर यांनी बनावट कागदपत्रे, शासकीय दस्तऐवज तयार करुन व सदर दस्तऐवजाचा वापर केल्याने त्यांच्याविरुध्द पनवेल तालुका पोलीस स्टेशन भादंवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ सह पारपत्र अधिनियम सन १९५० चे कलम ३ (अ), ६ (अ), परदेशी नागरिक अधिनियम १९४६ चे कलम ३, १४ अन्वये येथे गु.र.नं.२०३/२०१९ दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात अद्यापपर्यंत तीन आरोपी निष्पन्न असून सदर आरोपींना अटक केलेली आहे.
(३) सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये तपासी अधिकारी यांना शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द अद्यापपर्यंत कोणताही सबळ पुरावा आढळून न आल्याने त्यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## मध्यान्ह भोजन योजनेतील समितीने केलेल्या शिफारशींबाबत

**(१९) २४४२७ (२०-०२-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढण्याकरीता व शाळेतील विद्यार्थ्यांची गळती रोखण्याकरीता राष्ट्रीय शालेय मध्यान्ह भोजन योजना सन २००८-०९ पासून शाळांमध्ये सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय बालकांना मध्यान्ह भोजन योजनेव्दारे निकृष्ट दर्जाचे भोजन देण्यात येते अशा तक्रारी प्राप्त झाल्या असून केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार मध्यान्ह भोजनाद्वारा बालकांना किती प्रथिने आणि कॅलरीज मिळणे आवश्यक आहे,
(३) असल्यास, मध्यान्ह भोजनाचा दर्जा सुधारण्याच्या प्रकरणी अभ्यास करण्याकरीता श्री.ज. मो. अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती करण्यात आली असून सदर समितीने मध्यान्ह भोजनाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शिफारशी करुन शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मध्यान्ह भोजनाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने सदर समितीने काय शिफारशी केल्या आहेत, सदर शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०७-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजना दिनांक १५ ऑगस्ट, १९९५ पासून सुरु करण्यात आली आहे.
(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेंतर्गत इ.१ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इ.६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे भोजन देण्यात येते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर समितीने योजनेंतर्गत तांदूळ वाहतूकीसाठी स्वतंत्र यंत्रणेची नेमणूक करावी, धान्यादी मालाचा पुरवठा निविदा मागवून पुरवठेदारामार्फत करावा, नागरी भागात स्वयंसेवी संस्थेकडे तयार आहार

पुरवठ्याची जबाबदारी देण्यात यावी, योजनेचे सनियंत्रण प्रभावीपणे करावे अशा प्रमुख शिफारशी केल्या होत्या. समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने योजनेच्या अंमलबजावणीबाबत दिनांक १८ जून, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा केल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षकांच्या टी ई टी च्या प्रशैक्षणिक अर्हतेबाबत

**(२०) २४४२९ (२५-०२-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षकांना आर टी ई कलम २३ नुसार टी ई टी अर्हता दिनांक १ एप्रिल, २०१० पासून पाच वर्षाचे आत संपादित करणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर टी ई कायद्यातील तरतूद शिथिल करून टी ई टी ही प्रशैक्षणिक अर्हता संपादन करण्यास दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंतची मुदतवाढ देऊनही आर टी ई कायद्यातील तरतूद शिथिल करून टी ई टी परीक्षा उत्तीर्ण होण्यास आणखी चार वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार कार्यरत शिक्षकांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत संपादित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार दिनांक २४/०८/२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षकांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेली किमान अर्हता दिनांक ३०/०३/२०१९ अखेर धारण करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार कार्यरत शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत प्राप्त करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिक्षकांच्या सेवा संपुष्टात करण्यात याव्यात, अशी तरतूद करण्यात आली आहे. मार्च २०१९ नंतर शिक्षक पात्रता परीक्षा प्राप्त करण्यास मुदतवाढ मिळण्याबाबत केंद्र शासनास यापूर्वी विनंती करण्यात आली होती. सदरची अर्हता पूर्ण करण्यास पुरेशी संधी दिलेली असल्याने, सदरची मागणी केंद्र शासनाने अमान्य केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.